# प्रकरण – १ : अर्थशास्त्रातील मूलभूत संकल्पना

## प्रस्तावना :

नवनवीन वैज्ञानिक शोध व नवीन गोष्टी शोधून काढणे या बाबींचा ठसा आजच्या जगावर उमटलेला आहे. शास्त्रातील लक्षणीय प्रगतीमुळे शास्त्र म्हणजे नेमके काय? या प्रश्नाचा शोध लावण्याचा आपण प्रयत्न करू लागतो. शास्त्र ही एक पद्धतशीर मांडणीची ज्ञात शाखा आहे. शास्त्राचे मुख्य दोन प्रकार आहेत.

- नैसर्गिक शास्त्र
- सामाजिक शास्त्र

- ज्या शास्त्रातील नियमांना वैश्विक मान्यता आहे आणि या नियमांची सत्यता बंदिस्त प्रयोगशाळेत नियंत्रणांतर्गत पडताळून पाहता येते अशा शास्त्राला नैसर्गिक शास्त्र म्हणतात. प्रयोग व अनुमान यांवर आधारित अभ्यासामुळे या शास्त्राला तंतोतंत शास्त्र म्हणूनही ओळखले जाते. उदा. गणित, पदार्थविज्ञान, रसायन शास्त्र इत्यादी.

- सामाजिक शास्त्रास वर्तणूक शास्त्र किंवा अमूर्त शास्त्र म्हणतात. या शास्त्रात मानवी वर्तणुकीच्या कोणत्या न कोणत्या पैलूचा अभ्यास केला जातो. उदा. 'मानसशास्त्र' हे मानवी मनाच्या वर्तणुकीशी संबंधित ज्ञान देते. सामाजिक शास्त्र हे मानव समूहातील एक घटक असून त्या संदर्भाने त्याच्या सामाजिक घटकाबाबत ज्ञान देते. मानवी वर्तणूक ही बंदिस्त प्रयोगशाळेत तपासता येत नाही तसेच ती नियंत्रित पद्धतीनेही अभ्यासता येत नाही. सामाजिक शास्त्राच्या नियमांना वैश्विक मान्यता नसते. मात्र हे नियम मानवी प्रवृत्तींच्या संदर्भाने केलेली सर्वसाधारण विधाने असतात.

**अर्थशास्त्राचा अर्थ :** अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. 'अर्थशास्त्र' (Economics) हा शब्द मूळ ग्रीक शब्द 'ऑइकोनोमिया' (OIKONOMIA) यापासून आला आहे. याचा अर्थ ''कौटुंबिक व्यवस्थापन'' असा आहे.

पॉल सॅम्युल्सन यांनी अर्थशास्त्राचे वर्णन 'सामाजिक शास्त्रांची राणी' असे केले आहे. अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक वर्तणुकीच्या अभ्यासाशी निगडित आहे. या शास्त्रातून मानव आपल्या अमर्याद गरजा मर्यादित साधनांद्वारे कशा पूर्ण करतो हे हाताळले आहे.

अर्थशास्त्राच्या काही प्रसिद्ध व्याख्यांचा अभ्यास करून या विषयाची अधिक माहिती मिळवूयात.

**थोडे आठवा :**

खालील संबोध तुम्ही कुठे शिकला आहात? आर्थिक प्रणालीचे प्रकार, भांडवलशाही, समाजवाद आणि मिश्र अर्थव्यवस्था इत्यादी.

## कौटिल्य यांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन :



आकृती १.१
कौटिल्य

कौटिल्य यांच्या मते अर्थ म्हणजे 'संपत्ती' आणि शास्त्र म्हणजे 'विज्ञान', म्हणूनच अर्थशास्त्र म्हणजे संपत्तीचे संपादन आणि व्यवस्थापन. मूलत: कौटिल्य यांचा अर्थशास्त्र हा राजकीय अर्थव्यवस्थेवरील व्यापक ग्रंथ आहे.

## कौटिल्य यांच्या अर्थशास्त्रीय दृष्टीकोनाचे महत्त्वाचे मुद्दे :

१) सरकार किंवा राज्याची महत्त्वपूर्ण भूमिका.

२) संपत्ती निर्माण करण्यावर लक्ष्य केंद्रित करून राज्याचे कल्याण.

३) सुशासनासाठी कार्यक्षम प्रशासन यंत्रणेची आवश्यकता.

४) अर्थशास्त्रामध्ये राजकीय कल्पनांचे संकलन.

**तुम्हांला माहीत आहे का?**

कौटिल्य हे मौर्य कालखंडातील एक महान राजकारणी, तत्त्वज्ञानी, अर्थशास्त्रज्ञ व राजकीय सल्लागार होते. तसेच त्यांना चाणक्य किंवा विष्णुगुप्त म्हणून ओळखले जाते. त्यांनी प्राचीन भारतातील अर्थव्यवस्थेवर 'अर्थशास्त्र' हा राजकीय ग्रंथ लिहिला आहे.

## अर्थशास्त्राच्या व्याख्या :

### १) ॲडम स्मिथ यांची संपत्ती संबंधित अर्थशास्त्राची व्याख्या :



आकृती १.२
ॲडम स्मिथ

ॲडम स्मिथ यांना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ तसेच ''अर्थशास्त्राचे जनक'' असे मानले जाते. त्यांनी अर्थशास्त्राची संपत्तीविषयक व्याख्या १७७६ मध्ये प्रकाशित केलेल्या 'राष्ट्राची संपत्ती' (''An Inquiry

into the Nature and Causes of the Wealth of Nations.'') या ग्रंथात मांडली. ॲडम स्मिथ यांच्या मते, ''अर्थशास्त्र हे संपत्तीचे शास्त्र आहे.''

### ॲडम स्मिथ यांच्या व्याख्येचे महत्वाचे मुद्दे :

१) निर्हस्तक्षेपाचे धोरण

२) भांडवल व संपत्तीचा साठा

३) आर्थिक घडामोडींमध्ये नैसर्गिक नियम

४) वृद्धीच्या सिद्धांतामध्ये 'श्रम विभाजन' या विशिष्ट पैलूला महत्त्व

**तुम्हांला माहीत आहे का?**

'पॉल रोमर' आणि 'विल्यम नॉरधॉस' यांना २०१८ सालचा अर्थशास्त्रासाठी नोबेल स्मृती पुरस्कार प्राप्त झाला आहे. पॉल रोमर हे आर्थिक वृद्धीचे अभ्यासक आहेत. नॉरधॉस यांनी पर्यावरणीय अर्थशास्त्रामध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे.

**शोधा पाहू!**

अर्थशास्त्रातील इतर नोबेल पारितोषिक विजेते.

### २) प्रा. आल्फ्रेड मार्शल यांची कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या :



आकृती १.३
प्रा.आल्फ्रेड मार्शल

प्रा. आल्फ्रेड मार्शल यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या मांडली. ते नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ असून त्यांनी ''अर्थशास्त्राची मूलतत्त्वे'' (Principles of Economics) हे पुस्तक १८९० साली प्रकाशित केले.

आल्फ्रेड मार्शल यांच्या मते ''अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, या शास्त्रात प्राप्ती व आवश्यकतेनुसार उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर यासंबंधित वैयक्तिक व सामाजिक वर्तणुकीचा अभ्यास केला जातो.''

### मार्शल यांच्या व्याख्येचे महत्वाचे मुद्दे :

१) अर्थशास्त्र म्हणजे सामान्य माणसाचा अभ्यास.

२) अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक वर्तनाचे शास्त्र.

३) अर्थशास्त्र म्हणजे भौतिक कल्याणाचा अभ्यास.

४) अर्थशास्त्र केवळ संपत्तीचा अभ्यास नाही.

### ३) लिओनेल रॉबिन्स यांची दुर्मिळतेवर आधारित अर्थशास्त्राची व्याख्या :



आकृती १.४
लिओनेल रॉबिन्स

अर्थशास्त्राची ही अतिशय प्रसिद्ध व्याख्या आहे. रॉबिन्स यांनी १९३२ साली ''अर्थशास्त्राचे स्वरूप व महत्त्व'' (An Essay on the Nature and Significance of Economic Science) हे पुस्तक प्रकाशित केले. यात त्यांनी अर्थशास्त्राची दुर्मिळतेवर आधारित व्याख्या सांगितली.

''अमर्याद गरजा आणि मर्यादित परंतु दुर्मिळ व पर्यायी उपयोगाची साधने यांचा मेळ घालताना करण्यात येणाऱ्या मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय''.

### रॉबिन्स यांच्या व्याख्येचे महत्त्वाचे मुद्दे :

१) अमर्याद गरजा/साध्ये

२) मर्यादित साधने

३) गरजांचा प्राधान्यक्रम

४) साधनांचे पर्यायी उपयोग

**तुम्हांला माहीत आहे का?**

| विचार | अर्थशास्त्रज्ञांची नावे |
|---|---|
| सनातन संप्रदाय – १८ वे शतक | ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, जे.एस्.मिल, टी.आर्.माल्थस इत्यादी. |
| नव सनातन संप्रदाय – १९ वे शतक व २० व्या शतकाच्या सुरवातीचा अर्धा भाग | आल्फ्रेड मार्शल, ए.सी. पिगू, आयर्विंग फिशर इत्यादी. |
| आधुनिक संप्रदाय – २० व्या शतका पासून आज पर्यंत. | जे.एम.केन्स, लिओनेल रॉबिन्स, पॉल सॅम्युल्सन इत्यादी. |

### अर्थशास्त्राच्या शाखा :

सर रॅग्नर फ्रिश, यांनी १९३३ साली अर्थशास्त्राची दोन शाखांमध्ये विभागणी केली. त्या शाखा म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र होय. हे शब्द ग्रीक शब्द 'मायक्रोस' (Mikros) व 'मॅक्रोस' (Makros) यापासून आले आहेत.

### अ) सूक्ष्म अर्थशास्त्र :

'सूक्ष्म' म्हणजे लहान. सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. उदा. कुटुंब, कामगार, फर्म, उद्योग इत्यादी.

### केनेथ बोल्डींग यांची सूक्ष्म अर्थशास्त्राची व्याख्या :

''विशिष्ट उत्पादन संस्था, विशिष्ट कुटुंब, वैयक्तिक किंमती, वेतन, उत्पन्न, वैयक्तिक उद्योग आणि विशिष्ट वस्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय''.

### सूक्ष्म अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना :

**१) गरजा :** मोजक्या शब्दांमध्ये गरजेची व्याख्या करणे कठीण आहे, पण अर्थशास्त्रीयदृष्टीने समाधानाच्या अभावाची जाणीव म्हणजे 'गरज' होय. या जाणीवेतून मानव वैयक्तिक गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो.


मानवी गरजा वाढण्याची मुख्य दोन कारणे आहेत.

- नवीन शोध आणि नवप्रवर्तनामुळे राहणीमानाचा दर्जा सुधारण्याची इच्छा.
- लोकसंख्येमध्ये झालेली वाढ.

### गरजांची वैशिष्ट्ये :

i) **अमर्यादित गरजा :** गरजा या पुन्हा पुन्हा निर्माण होत असून, त्या कधीही न संपणाऱ्या असतात. एक गरज पूर्ण करेपर्यंत दुसरी गरज पुन्हा निर्माण होते. गरजा सातत्याने निर्माण होतात.

ii) **गरजा या पुनरुद्‌भवी असतात :** काही गरजा पुन्हापुन्हा निर्माण होतात. तर काही गरजा प्रसंगानुरूप निर्माण होतात.




आकृती १.५ अ, ब, क : वय आणि गरज

iii) **गरजा वयानुसार बदलतात :** वेगवेगळ्या गरजा व त्यांचे समाधान वयोपरत्वे बदलत असते. (आकृती १.५ अ, ब, क)

iv) **गरजा लिंगभेदानुसार बदलतात :** स्त्री-पुरुषांच्या गरजा आवश्यकतेनुसार बदलतात.

v) **गरजा पसंतीक्रमानुसार बदलतात :** प्रत्येक व्यक्ती आपापल्या सवयी, आवडीनिवडी आणि पसंतीनुसार गरजांची निवड करतो.



आकृती १.६ ऋतू आणि गरजा

vi) **गरजा हवामानानुसार बदलतात :** गरजा या वेगवेगळ्या हवामानानुसार, ऋतुमानानुसार बदलत असतात. (आकृती १.६)

vii) **गरजा संस्कृतीनुसार बदलतात :** गरजा या संस्कृतीनुसार बदलत असतात. गरजांच्या निवडीवर संस्कृतीचा प्रभाव पडतो. विशेषत: आहार, वेशभूषा इत्यादी.

**गरजांचे वर्गीकरण :**

गरजांचे वर्गीकरण खालील प्रकारे करता येते.

i) **आर्थिक आणि आर्थिकेत्तर गरजा :**

- ज्या गरजांची पूर्तता पैशांच्या साहाय्याने केली जाते त्यांना आर्थिक गरजा असे म्हणतात. वैयक्तिकरित्या त्यांचा मोबदला पैशाच्या स्वरूपात दिला जातो. उदा. अन्न , औषधे इत्यादी.
- ज्या गरजा पैशांशिवाय पूर्ण करता येतात त्या म्हणजे आर्थिकेत्तर गरजा होय. उदा. हवा, सूर्यप्रकाश इत्यादी.

ii) **वैयक्तिक गरजा आणि सामूहिक गरजा :**

- ज्या गरजा वैयक्तिक पातळीवर पूर्ण केल्या जातात त्यांना वैयक्तिक गरजा असे म्हणतात. उदा. डॉक्टरांचा स्टेस्थास्कोप, न्यायाधिशाचा कोट.
- सामूहिक गरजा या सामाजिक गरजा आहेत जेथे गरजांची सामूहिक पूर्तता होते. उदा. रेल्वे प्रवास.

iii) **जीवनावश्यक, सुखसोयीच्या आणि चैनीच्या गरजा :**

- मूलभूत गरजा म्हणजे जीवनावश्यक गरजा होय. उदा. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य इत्यादी.
- ज्या गरजा व्यक्तीला जीवनामध्ये सुखसमाधान देतात त्यांना सुखसोयीच्या गरजा असे म्हणतात. उदा. धुलाई यंत्र, मिक्सर, प्रेशर कुकर इत्यादी.
- ज्या गरजांमुळे व्यक्तीला आनंद व सामाजिक प्रतिष्ठा मिळते त्यांना चैनीच्या गरजा असे म्हणतात. **उदा.** वातानुकूलित गाडी, फर्निचरयुक्त घर.


**२) वस्तू आणि सेवा :** ही एक अर्थशास्त्रामधील प्रसिद्ध संकल्पना आहे.

- ज्या घटकाद्‌वारे मानवी गरज पूर्ण केली जाते त्यास वस्तू असे म्हणतात. वस्तूंना भौतिक अस्तित्व असते. उदा. शिक्षकाने वापरलेला खडू.
- सेवादेखील मानवी गरजा भागवतात. परंतु सेवांना भौतिक अस्तित्व नसते. उदा. शिक्षकांचे शिकवणे.

**३) उपयोगिता :** वस्तू व सेवांमध्ये असणारी मानवी गरज भागवण्याची क्षमता म्हणजे उपयोगिता होय.

**४) मूल्य :** अर्थशास्त्रामध्ये 'मूल्य' दोन प्रकारे सांगितले जाते. उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य.

- **उपयोगिता मूल्य** : उपयोगिता मूल्य हे एखाद्या वस्तूच्या मूल्याशी संबंधित आहे. सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास एखाद्या वस्तूची उपयुक्तता म्हणजे त्या वस्तूंचे उपयोगिता मूल्य होय. उदा. कोणालाही सूर्यप्रकाशासाठी किंमत द्यावी लागत नाही, परंतु प्रत्येकासाठी तो आवश्यक आहे. अर्थशास्त्रीय परिभाषेत सूर्यप्रकाशाला उपयोगिता मूल्य आहे. हे विनामूल्य वस्तूचे उदाहरण आहे.
- **विनिमय मूल्य** : विनिमय मूल्य म्हणजे एखाद्या वस्तूचे दुसऱ्या वस्तूच्या किंवा सेवेच्या रूपात व्यक्त केलेले मूल्य होय. हे मूल्य पैशांच्या स्वरूपात सांगितले की ती वस्तूची किंमत असते. ज्या वस्तूला पैशांत किंमत मोजावी लागते त्याला आर्थिक वस्तू म्हणतात. उदा. टीव्ही, कार इत्यादी.
- **हिरे-पाणी विरोधाभास** : काही वस्तूंचे उपयोगिता मूल्य जास्त तर विनिमय मूल्य कमी असते. उदा. पाणी तसेच काही वस्तूंचे उपयोगिता मूल्य कमी, पण दुर्मिळतेमुळे विनिमय मूल्य जास्त असते. उदा. हिरा. (आकृती १.७)



आकृती १.७ हिरे-पाणी विरोधाभास

**शोधा पाहू :**

**खालील उदाहरणांवरून विनामूल्य वस्तू किंवा आर्थिक वस्तू शोधा.**

- नदीचे पाणी
- ऑक्सिजन सिलेंडर
- सूर्यप्रकाश
- शुद्धीकरण केलेले पिण्याचे पाणी
- हवा

**५) संपत्ती :** ''संपत्ती म्हणजे ज्या वस्तूला बाजार मूल्य असते व त्याच वस्तूची देवाणघेवाण करता येते अशा वस्तूंना संपत्ती असे म्हणतात.''

संपत्तीची वैशिष्ट्ये :

i) उपयोगिता
ii) दुर्मिळता
iii) विनिमयता
iv) मनुष्यबाह्यता

i) **उपयोगिता :** वस्तूंमध्ये मानवाची गरज पूर्ण करण्याची क्षमता असली पाहिजे. उदा. फर्निचर, फ्रिज इत्यादी.

ii) **दुर्मिळता :** मागणीच्या तुलनेत वस्तूंचा पुरवठा दुर्मिळ असेल तरच त्याचा समावेश संपत्तीमध्ये होतो. उदा. सर्व आर्थिक वस्तू, ज्या वस्तूसाठी किंमत मोजली जाते.

iii) **विनिमयता :** वस्तूंचा विनिमय एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी करता आला पाहिजे. ज्या वस्तू मूर्त असतात त्यांचेच हस्तांतरण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होते. उदा. वाहने, दागदागिने इत्यादी.

iv) **मनुष्यबाह्यता :** वस्तू ही केवळ मानवी शरीरबाह्य असेल तरच ती हस्तांतरीत केली जाऊ शकते. हे त्याच्या बाह्य आणि वैयक्तिक गुणधर्मानुसार झाले पाहिजे. उदा. पिशवी, खुर्ची इत्यादी.

**तुम्हांला माहीत आहे का?**

जन्मजात मिळणाऱ्या गुणवत्तेचा समावेश संपत्तीत होत नाही. उदा. सौंदर्य, आवाज इत्यादी. हे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरण करता येत नाही.

**करून पहा.**

भौतिक हस्तांतरण क्षमता व मालकी हस्तांतरण क्षमतेनुसार वस्तूंची यादी तयार करा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**भौतिक हस्तांतरण क्षमता :** यामध्ये प्रत्यक्ष वस्तू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित केली जाते. उदा. वाहने

**मालकी हस्तांतरणक्षमता :** यामध्ये काही बदल करू शकत नाही, परंतु त्यांच्या मालकी हक्काचे हस्तांतर करता येते. उदा. जमीन

**६) वैयक्तिक उत्पन्न :** व्यक्तीला त्याच्या सर्व स्त्रोतांकडून मिळणारे मोबदले म्हणजे त्याचे वैयक्तिक उत्पन्न होय.

**७) वैयक्तिक व्ययशक्य उत्पन्न :** वैयक्तिक उत्पन्नातील असा भाग जो प्रत्यक्ष कर म्हणजे उत्पन्न कर, वैयक्तिक संपत्ती कर इत्यादी, भरल्यानंतर उरतो त्याला वैयक्तिक व्ययशक्य उत्पन्न म्हणतात.

**तुम्हांला माहीत हवे:**

**उत्पन्नाचे खालील प्रमाणे विविध प्रकार आहेत.**

**अ) स्थिर उत्पन्न :** विशिष्ट कालावधीत स्थिर असणारे उत्पन्न होय. उदा. भाडे, वेतन इत्यादी.

**ब) अस्थिर उत्पन्न :** विशिष्ट कालावधीत अस्थिर असणारे उत्पन्न होय. उदा. नफा. नफा हा धनात्मक, ऋणात्मक व शून्य असू शकतो.

**क) पैशातील उत्पन्न (प्राप्ती) :** जे उत्पन्न देशाच्या चलनात प्राप्त होते. त्याला पैशातील उत्पन्न किंवा मौद्रीक उत्पन्न म्हणतात. उदा. ₹ ५००० उत्पन्न.

**ड) वास्तव उत्पन्न :** प्रत्यक्ष खर्च करण्यायोग्य उत्पन्न होय. उदा. पैशाच्या मोबदल्यात वस्तूची खरेदी.


**इ) करारात्मक उत्पन्न :** विशिष्ट नियम व शर्तीनुसार मिळणारे उत्पन्न होय. उदा. खंड, मजुरी इत्यादी.

**ई) उर्वरित/शेष उत्पन्न :** उत्पादन घटकांना सर्व मोबदले दिल्यानंतर शिल्लक राहणारे उत्पन्न म्हणजे उर्वरित उत्पन्न होय. उदा. नफा.

**उ) अर्जित उत्पन्न :** उत्पादन प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर मिळणाऱ्या उत्पन्नास अर्जित उत्पन्न म्हणतात. उदा. खंड, वेतन, व्याज, नफा इत्यादींपासून मिळणारे उत्पन्न.

**ऊ) अनर्जित उत्पन्न :** कोणत्याही उत्पादन प्रक्रियेत सहभागी न होता इतर मार्गाने प्राप्त होणारे उत्पन्न म्हणजे अनर्जित उत्पन्न होय. उदा. लॉटरी, अनपेक्षित लाभ इत्यादी.

**८) आर्थिक क्रिया :** आर्थिक क्रियांचे वर्गीकरण चार प्रकारे केले जाते, ज्यामध्ये उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग यांचा समावेश होतो.




आकृती १.८ आर्थिक क्रिया

**अ) उत्पादन :** ''उपयोगितांची निर्मिती म्हणजे उत्पादन होय''. भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजक हे चार उत्पादनाचे प्रमुख घटक आहेत.

**हे नेहमी लक्षात ठेवा.**

जे उपक्रम केवळ दान छंद केले जातात तिथे आर्थिक विनिमय नसते तेथे अर्थव्यवस्थेला अनुत्पादक मानले जाते. त्याद्वारे जीवनात अमुल्य मूल्य वाढवू शकतात.

**उत्पादनाचे चार घटक :**

१) **भूमी :** 'भूमी' हा उत्पादनाचा नैसर्गिक घटक असून विनामूल्य देणगी आहे. ''भूपृष्ठालगत, भूपृष्ठाच्यावर व भूपृष्ठाच्या खाली उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीस अर्थशास्त्रामध्ये 'भूमी' असे म्हणतात''. उदा. खनिजे ही भूपृष्ठाखाली मिळतात, मृदा व पाणी हे भूपृष्ठालगत मिळते तर हवा व सूर्यप्रकाश भूपृष्ठावर मिळतात. म्हणजे अर्थशास्त्रात भूमी ही व्यापक संकल्पना आहे. उत्पादन कार्यात सहभागी झाल्याबद्दल भूमीला खंड मिळतो.

२) **श्रम :** उत्पादन प्रक्रियेत श्रम हा मानवी घटक आहे. आर्थिक मोबदला मिळविण्याच्या हेतूने मानवाने केलेले कोणतेही शारीरिक व बौद्धिक काम म्हणजे 'श्रम' होय. श्रम या उत्पादन घटकाला वेतन, मजुरी या स्वरूपात मोबदला मिळतो. उदा. सुतार, लेखनिक, अभियंता इत्यादींची कामे.

३) **भांडवल :** पुढील उत्पादन वाढीसाठी भांडवलाची निर्मिती केली जाते. भांडवल हा उत्पादनाचा मानवनिर्मित घटक आहे. भांडवल या उत्पादन घटकाला व्याजाच्या स्वरूपात मोबदला मिळतो. उदा. यंत्रसामग्री, तंत्रज्ञान, कारखान्याची इमारत इत्यादी.

४) **संयोजक :** ''उद्योगाचा प्रमुख व्यवस्थापक व कप्तान म्हणजेच संयोजक होय''. उत्पादन प्रक्रियेतील संयोजन कौशल्याबद्दल त्याला नफ्याच्या स्वरूपात मोबदला मिळतो.

**आ) वितरण :** उत्पादनाचे समाजाच्या विविध भागांमध्ये वितरण होते. उत्पादन घटकांचे मोबदले खंड, वेतन, व्याज, नफा या स्वरूपात वितरण व्यवस्थे द्वारे वितरीत केले जातात.

**इ) विनिमय :** ''विनिमय म्हणजे आर्थिक वस्तू व सेवांची देवाण-घेवाण किंवा खरेदी-विक्री होय''. अर्थशास्त्रामध्ये विनिमय हा प्रामुख्याने आर्थिक व्यवहाराशी संबंधित आहे.

**ई) उपभोग :** ''उपभोग म्हणजे मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी वस्तू व सेवांचा उपयोग करणे होय''.

## ब) स्थूल अर्थशास्त्र :

स्थूल म्हणजे मोठे किंवा एकूण. स्थूल अर्थशास्त्रामध्ये एकूण घटकांचा म्हणजेच एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पादन, एकूण गुंतवणूक, एकूण बचत, एकूण उपभोग, एकूण पुरवठा व एकूण मागणी, सामान्य किंमत पातळी इत्यादींचा अभ्यास केला जातो.

**केनेथ बोल्डींग यांची स्थूल अर्थशास्त्राची व्याख्या :**

''स्थूल अर्थशास्त्राचा संबंध वैयक्तिक परिमाणांशी नसून एकूण परिमाणांशी येतो, वैयक्तिक उत्पन्नाशी नसून राष्ट्रीय उत्पनाशी येतो, वैयक्तिक किंमतीशी नसून सर्वसाधारण किंमत पातळीशी येतो. तसेच वैयक्तिक उत्पादनाशी नसून राष्ट्रीय उत्पादनाशी येतो.''

**स्थूल अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना :**

**१) राष्ट्रीय उत्पन्न :** राष्ट्रीय उत्पन्न हे देशाच्या आर्थिक व्यवहारांशी संबंधीत असते त्याला देशाचे एकूण उत्पन्न असेही म्हणतात.

''एका आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादित झालेल्या अंतिम वस्तू व सेवांची बाजारभावानुसार केलेली गणना म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय''.

**राष्ट्रीय उत्पन्न समितीने दिलेली व्याख्या :**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एखाद्या विशिष्ट कालखंडात उत्पादित करण्यात आलेल्या वस्तू व सेवांची दुहेरी गणना टाळून केलेले मापन होय''.

**२) बचत :** उत्पन्नाचा असा भाग, जो भविष्यातल्या गरजा पूर्ण करण्यासाठी सध्याच्या उपभोगाचा त्याग करून शिल्लक राहतो त्यास बचत म्हणतात. तसेच बचत म्हणजे उत्पन्नाचा असा भाग, जो चालू उपभोगावर खर्च केला जात नाही.

**३) गुंतवणूक :** बचतीतून भांडवलाची निर्मिती होते आणि भांडवलाचा वापर उत्पादन प्रक्रियेसाठी करणे म्हणजे गुंतवणूक होय. उदा. यंत्रसामग्री, उपकरणे इत्यादी.

**४) व्यापार चक्र :** अर्थव्यवस्थेत घडून येणाऱ्या आर्थिक चढ-उतारामुळे जे व्यापारात बदल घडून येतात त्यांना व्यापारचक्रे असे म्हणतात. ते प्रामुख्याने आर्थिक क्रियांमधील चढ-उतारांमुळे निर्माण होतात.

**चढ आणि उतार** म्हणजे तेजी व मंदी होय.

- **तेजी :** सातत्याने सामान्य किंमत पातळीत होणारी वाढ म्हणजे तेजी होय.
- **मंदी :** सातत्याने सामान्य किंमत पातळीत होणारी घट म्हणजे मंदी होय.

**तुम्हांला माहीत आहे का?**

व्यापारातील चक्रीय बदलामुळे निर्माण होणाऱ्या बेकारीस 'चक्रीय बेकारी' असे म्हणतात.

**५) आर्थिक वृद्धी :** आर्थिक वृद्धी या संकल्पनेला संख्यात्मक दृष्टिकोन आहे. सोप्या शब्दांत सांगायचे तर आर्थिक वृद्धी म्हणजे दीर्घकाळात देशाच्या वास्तव उत्पन्नात झालेली संख्यात्मक वाढ होय.

**६) आर्थिक विकास :** आर्थिक विकास ही व्यापक संकल्पना असून यात एक गुणात्मक दृष्टिकोन आहे. आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वृद्धींसोबत मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांमध्ये गुणात्मक बदल घडवून आणणे होय. उदा. शिक्षण, आरोग्य इत्यादी.

**शोधा पाहू :**

**खालीलपैकी कोणत्या संज्ञा सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्राच्या आहेत.**

- जागतिक दारिद्र्य
- वस्तूची किंमत
- व्यवहार तोल
- उद्योगाचा नफा
- राष्ट्रीय उत्पन्न

**कायम लक्षात ठेवा**

| आर्थिक वृद्धी | आर्थिक विकास |
|---|---|
| १) आर्थिक वृद्धी म्हणजे देशाच्या वास्तव उत्पन्नात होणारी वाढ. | १) आर्थिक विकास म्हणजे आर्थिक वृद्धीबरोबरच महत्वपूर्ण आर्थिक घटकात परिवर्तनशील बदल जे लोकांच्या कल्याणात वाढ करतात. |
| २) ही संकल्पना संकुचित व संख्यात्मक आहे. | २) ही संकल्पना व्यापक व गुणात्मक आहे. |
| ३) आर्थिक वृद्धी आर्थिक विकासाशिवाय शक्य आहे. | ३) आर्थिक विकास आर्थिक वृद्धीशिवाय शक्य नाही. |
| ४) आर्थिक वृद्धी ही एकांगी संकल्पना आहे. | ४) आर्थिक विकास सर्वसमावेशक संकल्पना आहे. |
| ५) आर्थिक वृद्धी ही स्वयंस्फूर्त आणि प्रतिगामी होणारा बदल आहे. | ५) आर्थिक विकास हा सहेतुक व पुरोगामी होणारा बदल आहे. |
| ६) आर्थिक वृद्धी ही राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नाद्वारे मोजली जाते. | ६) आर्थिक विकास हा कृषी उत्पादकता, औद्योगिक उत्पादकता, जीवनमान दर्जा इत्यादींद्वारे मोजला जातो. |

**तक्ता : १.१**

## स्वाध्याय

### प्र.१. योग्य पर्याय निवडा :

**१) अर्थशास्त्राच्या बाबतीत पुढील विधाने लागू होतात.**

अ) अर्थशास्त्र हे एक सामाजिक शास्त्र आहे.

ब) अर्थशास्त्र या संकल्पनेचे मूळ ग्रीक शब्द 'ऑइकोनोमिया' (OIKONOMIA) पासून आले आहे.

क) अर्थशास्त्र हे मानवाच्या आर्थिक वर्तणुकीच्या अभ्यासाशी निगडित आहे.

ड) अर्थशास्त्र हे कौटुंबिक वा संपत्तीचे व्यवस्थापन करणारे शास्त्र आहे.

**पर्याय :** १) अ, ब, क  २) अ आणि ब  ३) ब आणि क  ४) अ, ब, क आणि ड

**२) ॲडम स्मिथ यांच्याबाबतीत कोणते विधान किंवा विधाने लागू होत नाहीत.**

अ) ॲडम स्मिथ यांना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणतात.

ब) ॲडम स्मिथ यांनी 'राष्ट्राची संपत्ती' हा ग्रंथ लिहिला.

क) 'अर्थशास्त्र' हे संपत्तीचे शास्त्र आहे.

ड) अर्थशास्त्र हे सामान्य माणसाचा अभ्यास करते.

**पर्याय :** १) ड  २) अ,ब आणि क  ३) अ आणि ड  ४) क आणि ड

**३) लिओनेल रॉबिन्स यांच्या व्याख्येत पुढील मुद्द्यांचा विचार केला आहे.**

अ) अमर्याद गरजा  ब) मर्यादित साधने

क) गरजांना अग्रक्रम नसतो  ड) साधनांचे पर्यायी उपयोग

**पर्याय :** १) अ आणि ब  २) ब आणि क  ३) अ, ब, क आणि ड  ४) अ, ब आणि ड

**४) संपत्तीच्या बाबतीत खालील विधाने लागू होतात.**

अ) संपत्ती म्हणजे अशी कोणतीही वस्तू जिला बाजारमूल्य आहे आणि त्याची देवाणघेवाण करते.

ब) संपत्तीत मनुष्यबाह्यता आहे.

क) संपत्तीत उपयोगिता नसते.

ड) संपत्तीत दुर्मिळता आणि विनिमयता आहे.

**पर्याय :** १) अ, ब, ड  २) अ, क आणि ड  ३) ब, क आणि ड  ४) यापैकी नाही.

**५) राष्ट्रीय उत्पन्नात खालील घटकांचा विचार केला जातो.**

अ) राष्ट्रीय उत्पन्नात अंतिम वस्तू व सेवांचा समावेश होतो.

ब) यात आर्थिक वर्षातील उत्पादित वस्तू व सेवांचा समावेश होतो.

क) दुहेरी मोजदाद टाळली जाते.

ड) बाजारभावानुसार मूल्य विचारात घेतले जाते.

**पर्याय :** १) अ आणि क  २) ब आणि क  ३) अ, ब आणि ड  ४) अ, ब, क आणि ड

### प्र. २. सहसंबंध पूर्ण करा :

१) नैसर्गिक शास्त्र : तंतोतंत शास्त्र :: सामाजिक शास्त्र : ______

२) भौतिक शास्त्र : ______ :: मानसशास्त्र : सामाजिक शास्त्र

३) अर्थशास्त्र : कौटिल्य :: राष्ट्राची संपत्ती : ______

४) आवश्यक गरजा : ______ :: सुखसोयीच्या गरजा : धुलाई यंत्र

५) विनामूल्य वस्तू : उपयोगिता मूल्य :: आर्थिक वस्तू : ______

### प्र. ३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा

१) वडिलांनी मला दुचाकी गाडी विकत घेऊन दिली. त्यामुळे माझी रोजच्या प्रवासाची गरज भागते.

२) रमेशच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा अभ्यास.

३) आर्थिक वर्ष २०१८-१९ नुसार देशाच्या उत्पादनात वस्तू व सेवांमध्ये २० टक्के वृद्धी झाली.

४) करुणाची आई तिच्या पगारातून दरमहा ₹ १००० वाचवते.

५) रामच्या वडिलांनी त्यांना मिळालेला प्रॉव्हीडंट फंड किराणामालाचे दुकान थाटण्यासाठी वापरला.

### प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :

१) संपत्तीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) मानवी गरजांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

### प्र. ५. खालील विधानाशी सहमत/असहमत आहात काय ? सकारण स्पष्ट करा :

१) सर्वच गरजा एकाच वेळी पूर्ण होत असतात.

२) मानवी गरजा ह्या हवामान व पसंतीक्रमानुसार बदलत असतात.

३) उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य दोन्ही एकच आहेत.

### प्र.६. सविस्तर उत्तरे लिहा :

१) स्थूल अर्थशास्त्राच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करा.